संजीवनी आदिवासी जाती व मागासवर्गीय शिक्षण संस्था, खरमतटोला
ता. कुरखेडा जि. गडचिरोली

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| (१) | श्रीमती रेखाताई रमेशजी बनपूरकर | - अध्यक्षा |
| (२) | श्री. बाबूरावजी तुलावी | - उपाध्यक्ष |
| (३) | श्री. सारंग रमेशजी बनपूरकर | - सचिव |
| (४) | सौ. रजनी धाबेकर | - सहसचिव |
| (५) | डॉ. अरुण नागपूरकर | - कोषाध्यक्ष |
| (६) | श्री. गोपालजी लोहंबरे | - सदस्य |
| (७) | सौ. संगीता बनपूरकर | - सदस्या |

## आमचे प्रेरणास्थान



**स्व. रमेशजी बनपूरकर**



**स्व. ॲड. विठ्ठलराव बनपूरकर**

ॲड. विठ्ठलराव बनपूरकर मेमोरियल कला व वाणिज्य महाविद्यालय
मालेवाडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली

## महाविद्यालय विकास समिती (C.D.C.)

## 2022 - 27

| | | |
|---|---|---|
| (१) | श्रीमती रेखाताई रमेशजी बनपूरकर | - अध्यक्षा |
| (२) | श्री. सारंग रमेशजी बनपूरकर | - सदस्य |
| (३) | डॉ. उदाराम फागूजी टेकाम | - सदस्य |
| (४) | श्री. सुधाकर वासुदेवजी भरणे | - सदस्य |
| (५) | श्री. वसंत ढेकलुजी घरते | - सदस्य |
| (६) | श्री. चित्तेश्वर पंढरीजी गुरनुले | - माजी विद्यार्थी |
| (७) | प्राचार्य डॉ. हरिश्चंद्र माधवराव कामडी | - विभाग प्रमुख |
| (८) | प्रा. दिलीप मुकुंदाजी नंदेश्वर | - समन्वयक (IQAC) |
| (९) | प्रा. डॉ. हिवराज इसरुजी राऊत | - शिक्षक प्रतिनिधी |
| (१०) | डॉ. प्रकाश दिलीपराव वैद्य | - शिक्षक प्रतिनिधी |
| (११) | डॉ. पल्लवी साहेबराव काळे | - महिला प्रतिनिधी |
| (१२) | श्री. हिरामण लक्ष्मणजी उईके | - शिक्षकेत्तर प्रतिनिधी |
| (१३) | विद्यार्थी परिषद अध्यक्ष | - विद्यार्थी प्रतिनिधी |
| (१४) | विद्यार्थी परिषद सचिव | - विद्यार्थी प्रतिनिधी |
| (१५) | प्राचार्य डॉ. हरिश्चंद्र माधवराव कामडी | - पदसिद्ध सचिव |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल/विवरण | पा.क्र. |
|---|---|---|
| (१) | Vision, Mission, Objectives of the Institution | ०४ |
| (२) | प्राध्यापकवृंद | ०५ |
| (३) | शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद | ०६ |
| (४) | विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचना | ०७-०८ |
| (५) | पालकांना निवेदन | ०८ |
| (६) | महाविद्यालयाचा परिचय | ०९-११ |
| (७) | विद्यार्थी सुविधा केंद्र | १२ |
| (८) | अभ्यास विषय | १३-१७ |
| (९) | प्रवेश घेण्यासंबंधी सर्वसामान्य माहिती व पात्रता | १८-१९ |
| (१०) | महाविद्यालयीन शुल्क | १९-२२ |
| (११) | सामान्य माहिती, सवलती व शिष्यवृत्ती | २३-२४ |
| (१२) | Side Wings of the College | २५-२७ |
| (१३) | वार्षिक शैक्षणिक नियोजन | २८-२९ |
| (१४) | Academic Calender | ३०-३१ |
| (१५) | करिअर कट्टा विषयक माहिती | ३२ |
| (१६) | विद्यापीठ गीत | ३३ |
| (१७) | राष्ट्रवंदना | ३४ |

# *Vision, Mission, Goals Of The Institution :*

### *Vision*

*To develop students into well educated, skilled and employable personnel whose collective energy will be the driving force for prosperity and quality of life in building the nation towards a "Super Power Nation "*

### *Mission*

*"Empowering, through quality education, the economically poor and marginalized tribal people of the region and making them well-integrated personalities and active participants in the mainstream of the nation for its rapid development."*

### *Goals*

- *Help the poor, uneducated people of the region • Empower the backward and depressed classes of the region.*
- *Act as an agent of progressive social change in this partly neglected area of the state.*
- *Contribute to the progress of national integration and communal harmony*
- *Lead to all-round development of the personality of the students focusing on the moral, intellectual, cultural and spiritual values and physical improvement.*
- *Bring about healthy changes in the backward community to convert it into a modern, scientific and prosperous society*



वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



भगवान बिरसा मुंडा

अॅड. विठ्ठलराव बनपूरकर मेमोरियल कला व वाणिज्य महाविद्यालय
मालेवाडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली

# प्राध्यापक वृंद

| | | |
|---|---|---|
| (१) | प्राचार्य डॉ. एच. एम. कामडी | - एम. कॉम. एम. फील, पीएच. डी., एम. ए. (अर्थशास्त्र) |
| (२) | प्रा. डी. एम. नंदेश्वर | - एम. कॉम. एम. फील, नेट, बी.एड्. |
| (३) | प्रा. डॉ. एच. आय. राऊत | - एम. कॉम., पीएच. डी., नेट |
| (४) | प्रा. डॉ. पी. डी. वैद्य | - एम. पी. एड. पीएच.डी. |
| (५) | प्रा. डॉ. पी. एस. काळे | - एम. लीब, पीएच.डी |

## विना अनुदानित पदवी विभाग सहाय्यक प्राध्यापक - सत्र २०२४-२५

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रा. बी. बी. कन्नाके | - एम. ए. (इतिहास) सेट |
| (२) | प्रा. आर. एम. रामटेके | - एम. ए. (अर्थशास्त्र) बी.एड्. |
| (३) | प्रा. पुजा जी. सोनुले | - एम. ए. (भूगोल) |
| (४) | प्रा. रुपेश लोहंबरे | - एम. ए. (राज्यशास्त्र), बी.एड्. |
| (५) | प्रा. प्रमोद कुमरे | - एम. ए. (मराठी), बी.एड्. |
| (६) | प्रा. एच.एस. सहारे | - एम. ए. (मराठी) |
| (७) | प्रा. कु. हेमलता शहारे | - एम. ए. (गृह अर्थशास्त्र) |
| (८) | प्रा. चेतन आष्टेकर | - एम. ए. (समाजशास्त्र) |

## अनुदानित पदवी विभाग घड्याळी तासिका सहाय्यक प्राध्यापक - सत्र २०२४-२५

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रा. डॉ. व्ही. व्ही. ठाकरे | - एम. कॉम., पीएच.डी |
| (२) | प्रा. भगत डी. नरुटी | - एम.ए. इंग्रजी, नेट, सेट |

## विना अनुदानित पदव्युत्तर विभाग घड्याळी तासिका सहाय्यक प्राध्यापक - सत्र २०२४-२५

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रा. उमेश जी. मेश्राम | - एम.ए. इतिहास |
| (२) | प्रा. गोपाल के. करमरकर | - एम.ए. समाजशास्त्र |
| (३) | प्रा. जितेंद्र एन. पिलारे | - एम.ए. राज्यशास्त्र |

अॅड. विठ्ठलराव बनपूरकर मेमोरियल कला व वाणिज्य महाविद्यालय
मालेवाडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली

# शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री. हिरामण लक्ष्मण उईके | - एम. ए., मुख्य लिपीक |
| (२) | श्री. देवेंद्र गजानन सेलोकर | - एम. ए., वरिष्ठ लिपीक |
| (३) | श्री. मनोज दिनकर समर्थ | - बी. ए., कनिष्ठ लिपीक |
| (४) | श्री. दीपक प्रकाश बनपूरकर | - ग्रंथालय परिचर |
| (५) | श्री. राहूल नानाजी वालदे | - शिपाई |
| (६) | श्री. अविनाश आनंदराव जांभुळे | - शिपाई |

## विशेष सुचना

**महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागातर्फे नविन शिष्यवृत्ती योजना :-**

**महाविद्यालयातील पदवी प्रवेशित खुला प्रवर्ग, अल्पसंख्यांक प्रवर्ग तसेच आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांना संस्था, महाविद्यालय, प्राध्यापक, माजी विद्यार्थी व अन्य घटकांतर्फे प्रायोजित शिष्यवृत्ती योजना आहे. या योजनेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

- **शिष्यवृत्ती योजना महाविद्यालयातील प्रवेशीत पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.**
- **ज्या विद्यार्थ्यांना कोणतीही शासकीय शिष्यवृत्ती प्राप्त होत नाही असे विद्यार्थी या योजनेचे लाभार्थी राहतील.**
- **शिष्यवृत्ती योजना आर्थीक दृष्टया मागासलेले व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी आहे.**

# विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचना

(१) प्रस्तुत माहिती पुस्तिकेतील नियमांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

(२) सोबत जोडलेले प्रवेश अर्ज प्रत्येक विद्यार्थ्यांने स्वतःच्या सुवाच्छ अक्षरात परिपूर्ण भरावे.

(३) महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आदर्श आचार संहिता पुस्तक ग्रंथालयात व महाविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तिचे सर्वांनी अवलोकन करावे व त्याप्रमाणे वागावे.

(३) महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांनी शिस्तीचे काटेकोर पालन करावे. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, इतर विद्यार्थी यांच्यासोबत गैरवर्तणूक कठोर शिक्षेस पात्र ठरेल.

(४) महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ड्रेस कोड अनिवार्य करण्यात आलेला आहे. सर्व विद्यार्थ्यांनी गणवेश लावूनच महाविद्यालयात यावे.

(५) महाविद्यालयातील सर्व पायाभूत सुविधा, साहित्याचा काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक आहे.

(६) सर्व महत्वाच्या सूचना महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावल्या जातील. विद्यार्थ्यांनी या सूचना वाचुन आवश्यक ती माहिती मिळवावी.

(७) विद्यार्थ्यांनी त्यांची वाहणे सायकल स्टँडवर उभी करून कुलूप लावावे. कुलूप न लावलेल्या सायकलची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहिल.

(८) प्राचार्यांच्या पुर्वपरवानगीशिवाय महाविद्यालय परिसरात सभा संम्मेलन किंवा इतर कार्यक्रम आयोजीत करता येणार नाही तसेच सुचना फलकावर माहिती लावता येणार नाही.

(९) महाविद्यालयात सतत गैरहजर असणे, अभ्यासात प्रगती मुळीच नसणे, गैरवर्तन, वेळेवर फी न भरणे किंवा खोटे प्रमाणपत्र सादर करून प्रवेश मिळविणे इत्यादी कारणांनी विद्यार्थ्याला महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

(१०) प्राचार्याच्या पुर्व परवानगीशिवाय महाविद्यालया संबंधी कोणतीही माहिती विद्यार्थ्यांनी प्रकाशनार्थ वर्तमानपत्रात देवू नये. असे केल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

(११) **महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थामध्ये रॅगींग करण्यास सक्त मनाई करण्याबाबत अधिनियम क्र. ३३ दिनांक १५ मे १९९९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेले आहे. या अधिनियमाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.**

(१२) एकदा प्रवेश घेतल्यानंतर स्विकारलेल्या ऐच्छिक विषयात बदल करता येणार नाही. तसेच कोणत्याही कारणास्तव मुळ प्रमाणपत्र परत केले जाणार नाहीत.

(१३) ७५% पेक्षा कमी हजेरी असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिक्षेला बसता येणार नाही.

(१४) महाविद्यालयातील ग्रंथालय, शारीरिक शिक्षण विभाग, चाचणी परिक्षा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शुल्क विभाग इत्यादी विभागांकडून Clearance Certificate / No Dues Certificate प्राप्त केल्याशिवाय परिक्षेचे आवेदन पत्र दिले जाणार नाही.

(१५) महाविद्यालय परिसरात तंबाखु, गुटखा, धूम्रपान किंवा इतर अंमली पदार्थांचे सेवण करण्यास मनाई आहे. तसे आढळल्यास रू. २००/- दंड व कडक कारवाई केली जाईल.

(१६) महाविद्यालयात येतांना प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज महाविद्याल्याचे ओळखपत्र सोबत आणने अनिवार्य आहे. आपले ओळखपत्र विद्यार्थ्यांनी सतत गळयात घालून ठेवावीत. त्यातील मजकुरात खोडखाड करू नये. ओळखपत्र हरवल्यास रू. २५ भरून कार्यालयातून नविन ओळखपत्र तयार करून घेता येईल.

(१७) पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनी महाविद्यालयात आठवडयातून किमान १ दिवस दर शनिवारला मोटारबाईक, स्कुटर किंवा कार ने येऊ नये. प्रवासासाठी सार्वजनिक बस चा, सायकल चा, आटो रिक्शा चा, ई-बाईक चा वापर करावा किंवा पायी यावे.

(१८) महाविद्यालयाचे वर्ग दि. १ जुलै २०२५ पासून नियमित सुरू होतील. विद्यार्थ्यांनी सुरूवातीपासून वर्गात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

(१९) विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती तपासण्यासाठी महाविद्यालयात गटचर्चा, प्रकल्प, घटक चाचणी, मौखिक परिक्षा तसेच सराव परिक्षा घेतल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्यांनी या परिक्षांना उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद देणे अनिवार्य आहे.

(२०) विद्यापीठ परिक्षेत प्रत्येक वर्गात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह संस्थेच्या वतीने शैक्षणिक गुणवत्ता गौरव व पालक सत्कार समारंभात सत्कार केला जातो.

(२१) विद्यापीठ परिक्षेत विद्याशाखेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याचा संस्थेकडून व प्राध्यापकांकडून रोख पारितोषिक देऊन गूणगौरव केला जातो.

(२२) महाविद्यालय परिसर प्लास्टीक मुक्त असल्याने विद्यार्थ्यांनी या संबंधाने पुर्ण खबरदारी घ्यावी.

(२३) महाविद्यालयात सुचना व तक्रार पेटी उपलब्ध आहे.

***

## पालकांना निवेदन

आपल्या पाल्याच्या सर्वांगीण प्रगतीकरिता आम्ही नेहमीच प्रयत्नशिल असतो. बऱ्याचवेळी आपल्या पाल्याची अनियमित हजेरी, अभ्यासातील कमजोरी, महाविद्यालयीन परिक्षेला न बसणे किंवा परिक्षेतील अपयश इत्यादी बाबतीत पालकांना माहिती नसते. प्रत्येक पालकाशी या बाबतीत संपर्क साधणे, आम्हालाही शक्य होत नाही. त्यामुळे आपल्या पाल्याची आपण इच्छितो तशी प्रगती होत नाही. यासाठी पालकांनी अधून मधून महाविद्यालयात येऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीची माहिती घेणे उचित व हितावह ठरेल या संदर्भात आम्हाला योग्य सहकार्य करून उपकृत करावे. आपण पालक-शिक्षक संघाच्या घेण्यात येणाऱ्या सभेला नियमित उपस्थित राहावे. यातच महाविद्यालयाचे व आपल्या पाल्याचे सार्थक आहे.

**प्राचार्य**

# महाविद्यालयाचा परिचय

आमचे श्रद्धास्थान ॲड. विठ्ठलराव बनपूरकर हे ब्रह्मपुरी विभागात सुविख्यात वकिल, शिक्षणप्रेमी, समाजवादी विचारसरणी मुळे सामान्य जनतेचा कळवळा असलेले व्यक्तिमत्त्व होते. 'आमच्या आदिवासी, मागासवर्गीय, ग्रामीण, जंगलव्याप्त, डोंगराळ भागातला प्रत्येक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये' या त्यांच्या विचारांची स्वप्नपूर्ती करण्यासाठी त्यांच्या जन्मगावी खरमतटोला येथे संजीवनी आदिवासी जाती व मागासवर्गीय शिक्षणसंस्थेची स्व. रमेश विठ्ठलराव बनपूरकर (संस्थेचे संस्थापक अध्यक्ष) यांनी सन १९८८ मध्ये स्थापना केली.

२००९ पासून संस्थेचे ॲड. विठ्ठलराव बनपूरकर मेमोरीयल कला व वाणिज्य महाविद्यालय, मालेवाडा येथे कार्यरत आहे. शहरी भागात उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचणीमुळे न जाऊ शकणारा विद्यार्थी ग्रामीण भागातही कला/वाणिज्य पदवीधर होऊ शकतो यावर संस्थेचा विश्वास आहे.

शिक्षणा शिवाय मानवी जीवनाचा विकास साध्य होऊ शकत नाही आणि तो वंचित राहू नये म्हणून अति दुर्गम डोंगराळ भागातही संस्थेने शिक्षणाची ज्ञानगंगा आणली. त्याचा परिसरातील विद्यार्थ्यांनी लाभ होईल व शहरी स्पर्धेसाठी विद्यार्थी सिद्ध होतील हा संस्थेचा मानस आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील मागासलेल्या आणि अशिक्षीत जनतेला उच्चशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस ॲड. विठ्ठलराव बनपूरकर मेमोरियल कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे. कला आणि वाणिज्य या दोन विद्याशाखा यशस्वीपणे राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पाठ्यक्रमासोबतच इतर कार्यक्रम महाविद्यालयात घेतले जातात. बदलत्या परिस्थितीला समर्थपणे सामोरे जातांना महाविद्यालात कला व वाणिज्य विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना प्रोजेक्टवर शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली तसेच कला शाखेत भूगोल, गृहअर्थशास्त्र, संगीत, इंग्रजी वांङमय, मराठी वांङमय, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र यासारख्या व्यवयहारोपयोगी विषयांची भर घालून विद्यार्थ्यांना विषय निवडीसाठी भरपूर पर्याय देण्यात आले.

ग्रामीण परिसरातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाचे दार उघडे करून या महाविद्यालयाने अल्पावधीत गडचिरोली जिल्ह्यातील उत्कृष्ठ शिक्षण संस्थापैकी एक हा बहुमान मिळविला. आजमितीस महाविद्यालयात ५५० च्या वर विद्यार्थी शिस्तीत ज्ञानार्जन करीत आहेत.

विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर घालण्यासाठी आणि सामाजिक बांधीलकी निर्माण करण्यासाठी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, लोकसंख्या शिक्षण मंडळ, निसर्ग मंडळ, रोजगार मार्गदर्शन केंद्र, महाविद्यालयातून दरवर्षी प्रकाशित होणारे वार्षिकांक 'अक्षरधारा', सांस्कृतीक विभाग इत्यादी प्रभावीपणे कार्यरत आहेत. याशिवाय सुसज्ज ग्रंथालय व वाचनालय, प्रशस्त क्रिडांगण व खेळाचे साहित्य, सर्व विषयांचे तज्ञ व अनुभवी प्राध्यापक, कार्यकुशल शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग ही आमच्या महाविद्यालयाची खास वैशिष्टये असून कुशल व सेवाभावी संचालक मंडळ यांचा महाविद्यालयाच्या उत्कर्षात व रचनात्मक कार्याच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे.

परिसराचा संपूर्ण शैक्षणिक विकास संस्थेला अपेक्षित असल्याने मालेवाडा परिसरात पदव्युत्तर शिक्षणाची सोय

नसल्यामुळे संस्थेने पदव्युत्तर वर्ग सुरू करण्याचा संकल्प केला व त्यानुसार शासन व विद्यापीठाची परवानगी घेऊन राज्यशास्त्र, इतिहास व समाजशास्त्र या विषयात एम.ए. व एम.कॉम. हे पदव्युत्तर वर्ग सन २०२३-२४ पासून सुरू केले आहे. पदव्युत्तर उच्चशिक्षणाचा लाभ परिसरातील मागासवर्गीय, ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या कमकुवत मुला-मुलींना मिळेल याचा आम्हाला विश्वास आहे.

ज्ञानसंवर्धन, शैक्षणिक समृद्धी यांचे हे महाविद्यालय केंद्रबिंदू ठरावे यासाठी कला व संस्कृती जोपासताना विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख आणि गुणवत्तापूर्ण उच्चशिक्षण देणे हा महाविद्यालयाचा उद्देश आहे. या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी या महाविद्यालयाचा विकास होणे काळाची गरज आहे. आमच्या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य जनतेलाही हे महाविद्यालय माझे आहे असे अभिमानाने वाटावे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामीण परिसारातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्चशिक्षण दानाचे कार्य करित महाविद्यालय सर्वच स्तरांवर नवनविन येशोशिखर पादाक्रांत करीत आहे.

महाविद्यालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या उच्चशिक्षणाची गुणवत्ता बदलत्या परिस्थितीत नियमीतपणे तपासणे आवश्यक असते. यासाठी सत्र २०१८-१९ मध्ये महाविद्यालयाने बंगलोर स्थित राष्ट्रीय मूल्यमापन व मानांकन परिषदेला महाविद्यालयात आमंत्रीत करून समितीने महाविद्यालयाच्या विविध घटकांशी संवाद साधला आणि महाविद्यालयाचा सर्वकष मूल्यमापन करून महाविद्यालयाला येणाऱ्या ५ वर्षांसाठी 'क' श्रेणीचा दर्जा दिला आणि महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे. आदिवासी बहूल गडचिरोली जिल्हयातील अविकसित घटकांना उच्चशिक्षण देणाऱ्या आमच्या महाविद्यालयासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे.

कला व वाणिज्य शाखेतील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील उपजतकलांचा व्यावहारिक दृष्टया विकास करण्यासाठी गोंडवाना विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालय स्तरीय खो-खो पुरूष स्पर्धेचे आयोजन करण्यात महाविद्यालय अग्रेसर राहिलेले आहे. सोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील विविध कौशल्य क्षमतांचा विकास करण्यासाठी महाविद्यालय पुढे झेपावले असून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी विविध अल्पमुदती अभ्यासक्रम (Short Term Course) राबविणार आहे.

**कला विभाग**

## हार्दिक अभिनंदन

**आमच्या महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी**



**कु. ज्योती महादेव दहीकर**
बि.ए. प्रथम वर्ष
प्रथम क्रमांक



**कु. निकिता हर्षवर्धन नाकाडे**
बि.ए. द्वितीय वर्ष
प्रथम क्रमांक



**कु. शितल देवराम बावणथडे**
बि.ए. तृतीय वर्ष
प्रथम क्रमांक व विद्याशाखेत प्रथम क्रमांक

## वाणिज्य विभाग

गो.वि.गड. अखिल भारतीय
क्रास कंट्री पुरुष संघ स्पर्धेत सहभाग



**कु. प्रतिक्षा राजेंद्र मोहुर्ले**
बि.कॉम. प्रथम वर्ष
प्रथम क्रमांक



**कु. प्रिया सुरेश घोडमारे**
बि.कॉम. द्वितीय वर्ष
प्रथम क्रमांक



**निलकंठ रामसिंग कुमरे**
बि.कॉम. तृतीय वर्ष
प्रथम क्रमांक व विद्याशाखेत प्रथम



**जय नलेश्वर नंदनवार**
बि.ए. द्वितीय वर्ष

गोंडवाना विद्यापीठाच्या सत्र २०२३-२४ च्या परीक्षेत महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखेतील वर्गात गुणानुक्रमे प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. बि.ए. भाग १,२ व ३ मध्ये प्रथम आलेल्या व बि.कॉम. भाग १,२ व ३ मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना प्रा. डी.एम. नंदेश्वर, प्रा. डॉ. एच.आय. राऊत, प्रा. डॉ. पी.डी. वैद्य व प्रा. डॉ. पल्लवी काळे यांचे कडून प्रत्येकी रोख रू. ७५१/- देऊन गौरविण्यात आले. तसेच कला विद्याशाखेत प्रथम आलेल्या कु. शितल देवराम बावणथडे व वाणिज्य विद्याशाखेत प्रथम आलेल्या निलकंठ रामसिंग कुमरे यांना श्री. सारंगजी बनपूरकर यांचे तर्फे रू. १००१/- व प्राचार्य डॉ. एम.एम. कामडी यांचे तर्फे रू.१००१/- देऊन गौरविण्यात आले.

**श्री. सारंग रमेशजी बनपूरकर**
सचिव
सं.आ.जा. व मा.शि. संस्था
खरमतटोला

**डॉ. हरिश्चंद्र माधवराव कामडी**
प्राचार्य
ॲड. व्हि.बी.एम. महाविद्यालय
मालेवाडा, जि. गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
# विद्यार्थी सुविधा केंद्र
## शां.पो. विधी महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

**महत्वाचे फोन नंबर**
**०७१३२-२२३१०४**

कार्यालय वेळ : स. १०.०० ते सायं. ५.३० पर्यंत
मध्यान्न अवकाश : दु. १.३० ते २.००
महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी केंद्र बंद राहील

**परिक्षा विभाग**
**०७१३२-२२३३२०, २२३३५०**

| **प्रमाणपत्र** | **आवश्यक कागदपत्र** |
|---|---|
| १) मायग्रेशन | ऑनलाईन टी.सी. कोड, ओरिजीनल टि.सी.<br>झेरॉक्स शेवटच्या वर्षाची मार्कशिट |
| २) इजिलिबीलीटी | १० ते सध्याचे सुरु असलल्या शिक्षणाची मार्कशिट<br>टि.सी. (शेवटची), आधारकार्ड |
| ३) प्रोव्हीजनल डिग्री | शेवटच्या २ सेमिस्टरची मार्कशिट (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी)<br>५ व्या व ६ व्या सेमिस्टरची मार्कशीट (इंजिनिअरिंग असल्यास)<br>७ व्या व ८ व्या सेमिस्टरची मार्कशीट) |
| ४) मार्कशिट दुय्यम प्रत | रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र, मार्कशीट झेरॉक्स<br>(नसल्यास टी.आर. झेरॉक्स) ऑनलाईन पेमेंअ केलेली पावती |
| ५) मार्कशीटवरील नाव करेक्शन | ओरिजिनल मार्कशीट जमा करणे व झेरॉक्स प्रत वर कलेक्शन करुन घेणे |
| ६) मार्कशीट व्हेरिफीकेशन | ओरिजनल मार्कशीट झेरॉक्स (पूर्ण) |

| **प्रमाणपत्र** | **शुल्क** |
|---|---|
| १) मायग्रेशन | रु. २००/-<br>(बी.ई., बी.एड., बी.पी.एड., बी.एफ.डी.,<br>एम.एफ.डी. असल्यास रु. ५००) |
| २) इलिजिबीलीटी | रू. २२०/- |
| ३) प्रोव्हीजनल डिग्री | रू. २२०/- |
| ४) मार्कशीट मधील नावात दुरूस्ती | रू. १००/- (प्रति मार्कशिट) |
| ५) डिग्रीमध्ये करेक्शन असल्यास | रू. १००/- |
| ६) मार्कशिट दुय्यम प्रत | रू. ११०/- |
| ७) मार्कशीट पडताळ (व्हेरिफीकेशन) | रू. २२०/- |
| ८) मार्कशीट आणि डिग्री व्हेरिफीकेशन | रू. ४००/- |

**Bank Details for online payment :-** Bank of India, A/C No. 964021110000002, IFSC Code : BKID0009648, A/c Name : Finance & Account Officer, Gondwana University, Gadchiroli

**Note** : 1) Cash deposit facility is not available at this facilitation center.

**२) सुविधा केंद्रामध्ये रक्कम रोखीने स्वीकाराण्यात येणार नाही.**

2) Direct deposit of cash in university account is prohibited. This type of payment will be sole responsibility of depositor. This type of payment will not be processed/taken in to account at all and cash deposited amount will be for feited by the university.

विद्यापीठाच्या खात्यात रोखीने रक्कम जमा करणे प्रतिबंधित आहे. अशा प्रकारे जमा केलेल्या रक्कमेची संपूर्ण जबाबदारी ही रक्कम जमा करणाऱ्या संबंधिताची असेल. अशा प्रकारे रोखीने जमा केलेली रक्कम कोणत्याच कामाप्रित्यर्थ विचारात घेतली जाणार नाही व अशी रक्कम विद्यापीठाकडून जप्त करण्यात येईल.

# अभ्यास विषय

## कला विद्याशाखा

### बी. ए. सत्र १ व २

Core / Major (Available Subjects : Select any two)

1. Sociology 2. Pol. Science 3. Economics 4. History
5. Marathi Literature 6. English Literature 7. Geography 8. Home-Economics
9. Music

VSC : (Any one based on Core / Major)
SEC : (Any one)
AEC : English, Marathi
OE : (**One** in sem. I and **Two** in Sem. II)
VEC : (Any one), IKS, CC

### बी. ए. सत्र ३, ४

**विषय** :- नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे

### बी. ए. सत्र ५ व ६

**आवश्यक विषय** :- १. आवश्यक मराठी ( Compulsory Marathi)
२. आवश्यक इंग्रजी ( Compulsory Communicative English)

**ऐच्छिक विषय** :- प्रत्येक ग्रुप मधून एक असे कोणतेही तीन विषय निवडावे.

गृप - १ **अर्थशास्त्र** किंवा **गृहअर्थशास्त्र**
(Economics OR Home Economics )

गृप - २ **राज्यशास्त्र** किंवा **समाजशास्त्र**
( Political Science OR Sociology)

गृप - ३ **भुगोल** किंवा **इतिहास**
(Geography OR History)

गृप - ४ **इंग्रजी वाङःमय** किंवा **मराठी वाङमय**
(English Literature OR Marathi Literature)

गृप - ५ **संगीत** (Music)

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ**
**अभ्यास केंद्र :- केंद्र क्रमांक 43101**
**पदवी अभ्यासक्रम** - १. बि.कॉम. २. बि.ए.

# वाणिज्य विद्याशाखा

Core / Major

**Available Subjects :**

1. Introduction to Financial Accounting - I & II
2. Introduction to Statistics & Business Mathematics - I & II

VSC : (Any one based on Core / Major)

SEC : (Any one)

AEC : English, Marathi

OE : (**One** in sem. I and **Two** in Sem. II)

VEC : (Any one), IKS, CC

## बी. कॉम सत्र ३,४

**विषय :-** नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे

## बी. कॉम सत्र ५

**'अ' ग्रूप (वाणिज्य)**

1. Advanced Account I (A/A-1)
2. Auditing
3. Commercial Law (C/L)
4. Business Communication and Management (BCM) Paper 1
5. Indian Economics (I/E) Paper 1

**'ब' ग्रूप (ऐच्छिक)**

1. Marketing Management (MM)

## बी. कॉम सत्र ६

**'अ' ग्रूप (वाणिज्य)**

1. Advanced Account II (A/A-2)
2. Income Tax
3. Corporate Law (C/L)
4. Business Communication and Management (BCM) Paper 2
5. Indian Economics (I/E) Paper 2

**'ब' ग्रूप (ऐच्छिक)**

1. Marketing Management (MM)

## पदव्युत्तर विभाग

**एम.ए. समाजशास्त्र - सत्र १ Subjects :** as per new education policy.

**विषय -**
1. Classical Sociology Theory
2. Methodology of Social Research
3. Rural Society of India
4. Social Movements in India
5. Research Methodology

**एम.ए. समाजशास्त्र - सत्र २ Subjects :** as per new education policy.

**विषय -**
1. Prospective on Indian Society
2. Methodology of Social Research-II
3. Urban Society in India
4. Social of Kinship, Marriage and Family
5. OJT / Field Project

**एम.ए. समाजशास्त्र - सत्र ३ Subjects :** as per new education policy.

**विषय -**
1. Classcial Sociologycal Tradition
2. Social Movements in India
3. Political Sociology
4. Tribal Society: Change and Development
5. Research Project

**एम.ए. समाजशास्त्र - सत्र ४ Subjects :** as per new education policy.

**विषय -**
1. Theoratical Perspective in sociology-II
2. Political Sociology
3. Methods of Social Research
4. Globalization and Society
5. Research Project

**एम.ए. इतिहास - सत्र १ Subjects :** as per new education policy.

**विषय -**
1. Historiography
2. India Under Companys Rule 1757-1856
3. Indian National Movement: 1905-1947
4. Modern World: 1914-1950
5. Research Methodology in History

**एम.ए. इतिहास सत्र २ Subjects :** as per new education policy.

**विषय -** 1. Trends and Theories in History
2. India Under British Rule: 1857-1905
3. Independent India : 1947-2000
4. Contemporary World : 1950-2000
5. OJT / Historical Application in Tourism (Field Project)

**एम.ए. इतिहास सत्र ३ Subjects :** as per new education policy.

**विषय -** 1) Emergence of Maratha Power (1707 to 1818 A.D.)
2) State in Ancient and Medieval India
3) Economic History of India (1757 to 1857)
4) History of Medieval Vidharbha
5) Research Project

**एम.ए. इतिहास सत्र ४ Subjects :** as per new education policy.

**विषय -** 1 Expansion of Maratha Power (1707 to 1818 A.D.)
2 State in British India Theory UA
3 Economic History of India (1858 to 1947 A.D.)
4 History of Modern Vidharbha
5 Research Project

**एम.ए. राज्यशास्त्र सत्र १ Subjects :** as per new education policy.

**विषय -** 1. Modern Indian Political Thought
2. Politics Of Maharashtra
3. Comparative Politics
4. Public Administration
5. Research Methodology

**एम.ए. राज्यशास्त्र सत्र २ Subjects :** as per new education policy.

**विषय -** 1. International Relation
2. Western Political Thought
3. Political Sociology
4. International Law
5. OJT / Field Project

**एम.ए. राज्यशास्त्र सत्र ३ Subjects :** as per new education policy.

**विषय -** 1. Indian Democracy and Political Process
2. Pressure Groups and Social Movements
3. Diplomacy and Foreign Policy
4. Political Theory and Political Analysis

**एम.ए. राज्यशास्त्र सत्र ४ Subjects :** as per new education policy.

**विषय -**
1. Modern Political Ideologies
2. State Politics in India
3. Human Rights : Problems and Prospects
4. Indian Government and Politics

**M. COM SEMESTER - I Subjects :** as per new education policy.
1. Advance Financial Accounting
2. Indian Financial System
3. Managerial Economics
4. Marketing Management
5. Research Methodology

**M.COM SEMESTER - II Subjects :** as per new education policy.
1. Research Methodology
2. Advance cost Accounting
3. Co-operation & Rural Development
4. Human Resource Management
5. OJT / Field Project

**M.COM SEMESTER - III Subjects :** as per new education policy.
1. Statistical Techniques
2. Tax Procedure and Practice
3. Public Finance
4. Advanced Service Sector Management

**M.COM SEMESTER - IV Subjects :** as per new education policy.
1. Advanced Management Accounting
2. Entrepreneurial Development
3. Introduction to GST
4. International Business Environment

**सूचना :-**

१. प्राचार्यांच्या पूर्ण परवानगीशिवाय एकदा घेतलेल्या विषयांमध्ये बदल करता येणार नाही.

२. विद्यार्थ्यांना सत्र २ करिता प्रवेशास पात्र ठरण्यासाठी सत्र १ च्या सर्व विषयांच्या विद्यापीठ परीक्षेला प्रत्येक्ष हजर राहणे आवश्यक आहे. सत्र ३ करिता पात्र ठरण्यासाठी सत्र १ चे किमान अर्धेविषय उत्तीर्ण करणे आवश्यक आहे तसेच सत्र २ च्या सर्व विषयांच्या विद्यापीठ परीक्षेला प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे. सत्र ४ करिता प्रवेशास पात्र ठरण्यासाठी सत्र २ चे किमान अर्धेविषय उत्तीर्ण करणे आवश्यक आहे तसेच सत्र ३ च्या सर्व विषयांच्या विद्यापीठ परीक्षेला प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे. सत्र ५ करिता प्रवेशास पात्र ठरविण्यासाठी सत्र १ व २ ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे तसेच सत्र ३ चे अर्धे विषय उत्तीर्ण करणे आवश्यक आहे आणि सत्र ४ चे सर्व विषयांच्या परिक्षेला प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३. कला (UG & PG) व वाणिज्य (UG & PG) विद्याशाखांसाठी महाविद्यालयात मराठी माध्यम स्विकारण्यात आले आहे.

# प्रवेश घेण्यासबंधी सर्व सामान्य माहिती व पात्रता

१. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण किंवा इतर तत्सम परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास पात्र राहील.

२. महाविद्यालयाची माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज महाविद्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

३. सोबतचे प्रवेश अर्ज योग्य पद्धतीने स्वहस्ताक्षरात परिपूर्ण भरावे. आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित सत्यप्रती जोडाव्यात तसेच आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळप्रती प्रवेश घेते वेळीच महाविद्यालयात जमा कराव्यात.

४. पूर्ण भरलेले प्रवेश अर्ज आवश्यक त्या प्रमाणापत्रासहीत महाविद्यालयातील प्रवेश समीतीस निश्चित केलेल्या वेळेत सादर करावीत.

५. प्रवेशासंबंधी वेळोवेळी सुचना महाविद्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येतील.

६. आवश्यकता भासल्यास संभाव्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी सुचना फलकावर लावण्यात येईल.

७. महाविद्यालयात प्रवेशाची शेवटची तारीख विद्यापीठाच्या निर्देशाप्रमाणे दिनांक ०४ ऑगष्ट २०२५ आहे. त्यापुर्वी महाविद्यालयात आवश्यक विद्यार्थी संख्या पूर्ण झाल्यास प्रवेश बंद करण्याचा अधिकार महाविद्यालयाला आहे.

८. मा. कुलगुरुंच्या पूर्व परवानगीने महाविद्यालयात प्रवेशाची शेवटची दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ आहे.

९. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळ किंवा गोंडवाना विद्यापीठा व्यतिरिक्त इतर विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना Migration Certificate आवश्यक करण्यात आलेले आहे.

१०. स्वतःचे दोन पासपोर्ट साईज (२''×२'') छायाचित्र आवेदन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

११. विद्यार्थ्यांचे नामांकन अर्ज विद्यापीठात सादर करण्याची अंतीम दिनांक २५ ऑगष्ट २०२५ असल्याने दिनांक ३१ जुलै २०२५ पूर्वी नामांकन अर्ज महाविद्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

१२. प्रवेश देणे किंवा न देणे, प्रवेश दिल्यानंतर महाविद्यालयाचे नियम मोडणाऱ्या विद्यार्थांचे नाव काढून टाकणे या संबंधीचे संपूर्ण अधिकार प्राचार्यांना आहेत.

१३. **महाविद्यालयात प्रवेश घेताना प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचा ईमेल आयडी आणि वाटस्ॲप भ्रमणध्वणी क्रमांक प्रवेश अर्जात स्पष्टपणे नमुद करावे आणि शक्यतो आपला भ्रमणध्वनी क्रमांक बदलू नये. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार 'एबीसी पोर्टल' वर प्रत्येक विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे.**

१४. प्रवेशासंबंधी किंवा प्रवेश अर्ज भरण्यासाठी आवश्यक ती माहिती आणि मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश समितीतील प्राध्यापकांशी संपर्क साधावा.

१५. **प्रवेश अर्जासोबत जोडावयाचे प्रमाणपत्र व सत्यप्रती (दोन प्रतीत) :**

I. शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र (School or College Leaving Certificate)

II. पात्रता परिक्षा पास केल्याची मुळ गुणपत्रिका (Mark-List)

III. चारित्र्य प्रमाणपत्र (Original Character Certificate)

IV. खाजगी परिक्षा दिली असल्यास प्रवेशाची पात्रता दर्शविणारे प्रमाणपत्र

V. गोंडवाना विद्यापीठा व्यतिरिक्त इतरत्र परिक्षा पास केले असल्यास निर्गमन प्रमाणपत्र (Migration Certificate) दिनांक १७ ऑगष्ट २०२५ पूर्वी विद्यापीठात पोहचणे आवश्यक असल्याने ते दिनांक ३१ जुलै २०२५ पूर्वी महाविद्यालयात सादर करावे.

VI. प्रवेश मिळाल्यानंतर १५ दिवसाचे आत फी माफीचा अर्ज कार्यालयात सादर करावा.

VII. अनु. जाती, अनु. जमाती, भटक्या, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय असल्याचा दाखला.

१६. **प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी सर्व प्रमाणपत्रांच्या विशेषतः शाळा सोडल्याचे मुळ प्रमाणपत्रांच्या पुरेशा सत्य प्रती आपल्या जवळ ठेवाव्यात. एकदा प्रवेश घेतल्यानंतर मुळ प्रमाणपत्र परत केले जाणार नाही.**

१७. इयत्ता १० वी ची गुणपत्रिका (झेरॉक्स) दोन प्रतीत जोडणे अनिवार्य आहे.

१८. आधार कार्डची व निवडणुक ओळखपत्राची छायांकीत प्रत जोडणे अनिवार्य आहे.

१९. निवडणूक ओळखपत्र नसल्यास तहसिल कार्यालय/महाविद्यालयातुन फार्म घेऊन ते महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावे.

२०. तहसिलदाराचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

२१. बँक पासबुक/पोष्टाचा पासबुक.

२२. राशन कार्ड.

